REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# भारतीय संविधान सभेतील स्त्रियांचे योगदान

प्रा. सौ. प्रज्ञा संदीप नंदेश्वर
रा .तू .म .नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारा संचालित ,
श्री .चक्रपाणी कला महाविद्यालय , पवार नगर ,नागपूर



भारतीय संविधान हे संविधान सभेच्या अथक व अविश्रांत परिश्रमाची फलश्रुती आहे. संविधान सभा किंवा घटना समितीची स्थापना कॅबिनेट मिशन योजनेनुसार नोव्हेंबर 1946 मध्ये झाली. घटना समितीसाठी ब्रिटिश भारताच्या प्रांतांमधील 296 जागांसाठी जुलै-ऑगस्ट 1946 मध्ये निवडणुका घेण्यात आल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 208 जागा जिंकल्या तर मुस्लीम लीगने 73 जागांवर विजयी झाले.इतर छोट्या गट व अपक्ष उमेदवारांना उरलेल्या 15 जागा मिळाल्या, परंतु संस्थानांनी घटना समितीत सहभागी न होण्याचे ठरविल्यामुळे त्यांना दिलेल्या 93 जागा रिकाम्या राहिल्या.

जरी घटना समिती भारतातील लोकांनी प्रोढ मताधिकारानुसार प्रत्यक्ष पद्धतीने निवडलेली नसली तरी घटना समितीत हिंदू, मुस्लिम, शीख ,पारशी, आंग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच या घटकातील महिला या भारतीय समाजातील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व होते .

भारतीय स्वातंत्र्य कायदा 1946 अन्वये 31 डिसेंबर 1946 रोजी प्रांतनिहाय सदस्य संख्या कॅबिनेट मिशन योजनेने ठरवण्यात आल्यानुसार 392 ऐवजी 299 इतकी होती आणि यामध्ये एकूण 15 महिला सदस्य या संविधान सभेमध्ये होत्या. भारतीय परिस्थितीचा विचार करता त्या काळी महिलांचे प्रतिनिधित्व चार टक्के एवढे असणे ही अत्यंत महत्वाचे होते असे आपणास म्हणता येते .स्वातंत्र्य सेनानी, वकिल,लेखक, आणि राजकारण या क्षेत्रातील गणमान्य स्त्रियांचा त्यात समावेश होता.या सर्व १५ स्त्रियांची नावे पुढीलप्रमाणे आहेत .

1) अम्मू स्वामीनाथन
2) दक्षयानी वेलायुधन
3)बेगम एजाज रसूल
4)दुर्गाबाई देशमुख
5)हंसा जीवराज मेहता
6) कमला चौधरी
7)लीला रॉय
8)मालती चौधरी
9)पूर्णिमा बॅनर्जी
10)राजकुमारी अमृत कौर

11)रेणुका रे

12) सरोजनी नायडू

13)सुचिता कृपलानी

14)विजयालक्ष्मी पंडित

15) एनी मारकारेन

वरील 15 स्त्रियांनी मर्यादित संख्या असूनही घटनात्मक तरतुदी तयार करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली .वैकल्पिक मते देऊन तसेच मसुद्याच्या प्रस्तावावर टीका करून त्यांनी संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी आपले अमूल्य योगदान दिलेले आहे. यापैकी काही स्त्रियांच्या योगदानाची उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील .

1) विधानसभेत महिला आरक्षणाऐवजी महिलाच्या अल्पसंख्याक हक्कांची मागणी केली.अशाप्रकारे त्यांनी पुरुष आणि स्त्रियांमध्ये घटनेच्या कलम १४ ,१५ ,१६ नुसार समानता स्थापित करण्यास मदत केली .
2) स्वतंत्र न्यायव्यवस्था स्थापन करण्या साठी आवाज उठवून त्यांनी प्रत्यक्षात कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कार्य केले.
3) दक्षयानी वेलायुधन ह्या संविधान सभेवर निवडून आलेल्या एकमेव दलित महिला प्रतिनिधी होत्या .त्यांनी संविधान सभेमध्ये डॉक्टर आंबेडकर यांच्या सोबत जाती संबंधी अनेक मुद्द्यावर आपले मत मांडली, त्यामुळे दलितांविरुद्ध सामाजिक कलंक असलेल्या संविधानातील अस्पृश्यतेच्या अधिकाराचे (कलम १७ ) त्यांनी समर्थन केले.
4) हंसा जिजाराम मेहता या मूलभूत अधिकार उपसमिती सल्लागार समिती व प्रांतीय संविधानाने समितीच्या सदस्य होत्या .15 ऑगस्ट 1947 च्या मध्यरात्री भारतीय महिलांचे प्रतिनिधित्व म्हणून स्वतंत्र भारताचा पहिला राष्ट्रीय ध्वज संविधान सभेला भेट केला. महिला चळवळीत त्यांनी अविभाज्य भूमिका निभावली त्यांनी बालविवाह ( THE SARDA ACT) आणि देवदासी प्रथेचाही विरोध केला. तसेच त्यांनी राजकुमारी अमृत कौर यांच्याबरोबर भारतीय महिलांच्या हक्क आणि कर्तव्य यांची सनद तयार केली .त्याचबरोबर .संविधान सभेतील अनेक चर्चांमध्ये सहभागी होऊन समान नागरि कोड (कलम ४४ ) हा संविधानाचा एक न्यायपूर्ण भाग असावा यासाठी आवाज उठविला.
5) अम्मू स्वामीनाथन ह्या वकील होत्या व उच्च जातीच्या असूनही त्यांनी पुरातन व अत्याचारी अशा जातिप्रथेचे उच्चाटन करण्यासाठी डॉ.बी .आर . आंबेडकर यांची बाजू घेऊन अनेक जातीविषयक मुद्दे मांडले तसेच अनेक वेळा पंडित ही श्रेष्ठ वर्चस्व दर्शविणारी पदवी वापरण्यासाठी नेहरू यांच्यावर टीकाही केली.
6) बेगम एजाज रसूल ह्या एकमेव मुस्लिम महिला होत्या ज्या उत्तर प्रदेश येथून संविधान सभेमध्ये निवडून गेल्या होत्या.
7) दुर्गाबाई देशमुख ह्या घटक मंडळाचे अध्यक्ष पद भूषविणाऱ्या एकमेव महिला होत्या. त्याच बरोबर अनेक समाज कल्याणकारी कायदे लागू करण्यात त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण भूमिका निभावलेली दिसून येते.

त्याचबरोबर सरोजनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित यांनी सुद्धा संविधान सभेमध्ये अनेक मुद्द्यांवर आपले मत मांडून आपला ठसा उमटवला होता .भारतीय संविधानाचा मसुदा तयार करताना अनेक महत्त्वपूर्ण नावांमध्ये डॉक्टर बी आर आंबेडकर पंडित नेहरू वल्लभभाई पटेल व इतर अनेक मान्यवरा बरोबर संविधान सभेतील या 15 स्त्रियांचे योगदान भारत कधीही विसरू शकत नाही.कारण ज्या भारतामध्ये संविधान निर्मितीच्या काळात वर्णव्यवस्थेचे बरोबरच लैंगिक असमानता टोकाला पोचली होती अस्पृश्यां बरोबरच स्त्रियांनाही अनेक अधिकार नाकारले गेलेले होते,त्या काळात वर उल्लेखित १५ स्त्रियांनी संविधान सभेत इतर सदस्यांच्या बरोबर आपले अमूल्य योगदान देवून असे संविधान तयार केले ज्या मध्ये सर्व भारतीय नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्यायाची हमी देण्यात आली. स्त्रियांचा दर्जा उंचाविण्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या व अनेक वाईट प्रथांचे उच्चाटन करण्यात आले. त्यामुळे या सर्व 15 स्त्रियांचे संविधान सभेतील कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण व अधोरेखित करण्यासारखे आहे असेच आपणास म्हणावे लागते.

संदर्भ ग्रंथ :-

१ ) एम .लक्ष्मीकांत ,इंडिअन पोलिटी फॉर सिविल सर्विसेस एक्षमिनेशन ,त्रितीय आवृत्ती ,(नवी दिल्ली टाटा मेंक ग्रा प्रा.लि.,२०११ )

२) बरुआ ,एल .एम .(१९९२)आधुनिक भारताचे शिल्पकार लोक्प्रीय गोपीनाथ बोदालोई ,ज्ञान पुब्लीशिंग हाउस .

३) constitutional Debates volumes.